राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळच्या विनंती बदली संदर्भातील धोरण.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बैठक-२८२३/प्र.क्र.२८/आरोग्य-७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १० डिसेंबर, २०२४

वाचा :-

(१) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या समस्यांबाबत मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०८/०२/२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

(२) अवर सचिव, राष्ट्रीय आरोग्य अभियान, भारत सरकार यांचे पत्र क्र.Z. २८०१५/१३२/२०-२२ NHM-I, दिनांक २२/०८/२०२३

(३) सहाय्यक संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/HWC/CHO/बदली धोरणाबाबत/४६७५२-७५७/२४, दिनांक ०९/१०/२०२४

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचारी हे बदली पात्र नसतात. त्यामुळे समुदाय आरोग्य अधिकारी हे पद बदली पात्र नाही. समुदाय आरोग्य अधिकारी हे पद बदली पात्र नसल्याने सदर पदावरील कर्मचा-यांस एकाच ठिकाणी एकाच पदावर कार्यरत रहावे लागत असल्यामुळे स्वाभाविक सदर कर्मचा-यांकडून सदर पद बदली पात्र होण्यासाठी वारंवार शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत. अशा निवेदनाच्या अनुषंगाने समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदलीच्या समस्यांबाबत मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०८/०२/२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. त्यामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आपापसात (Mutual) बदलीबाबत कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आला. कार्यकारी समितीने प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनाचे समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदली संदर्भातील मार्गदर्शन घेण्याबाबत केंद्र शासनाशी पत्र व्यवहार करण्याबाबत सुचना दिल्या. त्या

अनुषंगाने आयुक्त, आरोग्य सेवा स्तरावरुन केंद्र शासनाशी पत्र व्यवहार करण्यात आला. केंद्र शासनाने प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्र.(२) येथील पत्रान्वये बदली हा विषय पुर्णपणे राज्यशासनाशी संबंधित असल्याचे कळविले आहे. राज्यातील समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या समस्या, पती-पत्नी एकत्रिकरण, कौटुंबिक कारणास्तव तसेच, वैद्यकीय कारणास्तव बदली करण्याबाबत दिलेली निवेदने व केंद्र शासनाने समुदाय आरोग्य अधिकारी हा विषय पुर्णपणे राज्य शासनाचा असल्याने समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदल्यासंदर्भात धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांची संपुर्ण सेवा कालावधीत एकवेळची विशेष बाब म्हणून विनंती बदली करण्यास शासन याद्वारे मंजूर देत आहे.

समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदली संदर्भातील सक्षम प्राधिकारी तसेच बदली संदर्भातील अटी शर्ती पुढील प्रमाणे राहतील:-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी या संवर्गातील बदली करण्यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाचे मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव हे सक्षम प्राधिकारी राहतील.

(२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी हे पद एकवेळची विशेष बाब म्हणून बदली पात्र करण्यात येत आहे.

(३) समुदाय आरोग्य अधिकारी यांची अशा प्रकारे एकवेळची विशेष बाब म्हणून बदली झाल्यानंतर पुन्हा ते कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलीस पात्र होणार नाही, व अशा प्रकारची बदली पुन्हा करण्यात येणार नाही.

(४) समुदाय आरोग्य अधिकारी यांची बदली झाल्यानंतर व बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर बदली पुर्वीच्या पदावर घेत असलेले वेतन व भत्ते संरक्षित राहतील.

(५) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या एकवेळ बदलीसाठीचा सेवा कालावधी हा किमान ३ वर्षाचा असेल.



Scanned with OKEN Scanner

(६) समुदाय आरोग्य अधिकारी या संवर्गातील बदली करताना त्यांच्या पुर्वीच्या जिल्हयातील सवंर्गातील ७० टक्केपेक्षा जास्त रिक्त जागा राहणार नाही.

(७) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आरोग्यवर्धिनी कार्यक्रमामध्ये कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांचे पती-पत्नी एकत्रिकरण धोरणानुसार, दुर्धर आजाराने कुटूंबातील व्यक्ती आजारी असल्यास, जागांच्या उपलब्धतेनुसार तसेच, त्यांच्या विनंतीनुसार बदली करण्यात यावी.

(८) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या विनंतीनुसार प्राप्त होणा-या बदलीच्या अर्जांची छाननी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या स्तरावर करुन प्रस्ताव सक्षम प्राधिकारी म्हणून मा. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या मान्यतेसाठी सादर करुन मान्यता प्राप्त झाल्यानंतर बदलीचे आदेश निर्गमित करण्यात यावेत.

(९) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदली धोरणाची अंमलबजावणी शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात यावी.

(१०) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या दरवर्षी करण्यात येणाऱ्या बदल्या माहे एप्रिल व मे महिन्यात करण्यात याव्यात. तथापि, सदयस्थितीत या वर्षीच्या बदल्या माहे डिसेंबर, २०२४ या महिन्यात करण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

१०/१२/२०२४

( राजेंद्र वि. कुडले )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती) (पत्राने)
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
५. सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य
६. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.



Scanned with OKEN Scanner

७. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई.
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
९. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.
१०. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) २, महाराष्ट्र, नागपूर,
११. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१२ महाप्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१३. प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
१४. प्रबंधक, मा. लोकायुक्त व मा. उप लोकायुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.
१५. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१६. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१७. वित्त विभाग/ व्यय- १३, मंत्रालय, मुंबई-
१८ नियोजन विभाग / कार्यासन १४७२, मंत्रालय, मुंबई.
१९.सर्व विभागीय आयुक्त
२०. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई-
२१ सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२३. संचालक (आरोग्य सेवा-१), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
२४. संचालक (आरोग्य सेवा-२) आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे
२५. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
२६. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे.
२७. उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये
२८. सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, (FWB मार्फत)
२९. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, (FWB मार्फत)
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३१. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
३२. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
३३. सर्व कोषागार अधिकारी
३४. सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई- ४००००१
३५. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-७)

Scanned with OKEN Scanner